पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ४
सभावृत्तांत

दि.- १/७/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.१/७/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर - सभापती
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा. आल्हाट धनंजय मुरलीधर
४ मा.मडिगेरी वर्षा विलास
५ मा. सुपे आशा रविंद्र
६ मा. गोफणे अनुराधा देविदास
७ मा.गव्हाणे सुरेखा शंकर
८ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
९ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रीय अधिकारी- श्रीम.आशादेवी दुरगुडे, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जयंत बरशेट्टी, कार्यकारी अभियंता (पापु), मा.प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता (मा.श्रीम.प्रभावती मा.पाटील-पर्यवेक्षक, मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता,मा.श्री.वाघमारे एस.बी.-उपअभियंता, मा. श्री. एस. व्ही. बगाडे- सहा उद्यान अधिक्षक, मा.श्री.दवंडे शशिकांत – कनिष्ट अभियंता, मा.एम.एम. चव्हाण – उपअभियंता (विद्युत), मा.श्री.राऊत व्ही.एस. उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.पाटील एस.एम.- उपअभियंता (स्थापत्य) मा.खडतरे एस.एस.- कनिष्ट अभियंता, मा.हेमंत घोड - कनिष्ट अभियंता, मा.श्री.वाडकर एस.व्ही - कनिष्ट अभियंता, मा.गनबोटे ए.पी.- कनिष्ट अभियंता, मा.श्री.कोतकर पी.बी.- कनिष्ट अभियंता, मा.श्री.दिग्विजय पवार - कनिष्ट अभियंता (पा.पु.), मा.श्री.एस.ए.बगली - कनिष्ट अभियंता (पा.पु.), श्री.चव्हाण एच.एम. –मुख्याध्यापक मा.वि. भोसरी, श्री.शिराळ एस डब्ल्यू – मुख्याध्यापक मा.वि. लांडेवाडी,

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्रमांक १-** रस्त्यास व कमानीस नाव देण्याबाबत मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र

**विषय क्रमांक २-** नामकरण करण्याबाबत मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र

**विषय क्रमांक ३-** प्रभाग क्र. ३३ मधील आरक्षण क्र. ४०७ सर्व्हे नं. २०० खेळाचे मैदानमध्ये पाण्याची टाकी बांधणेबाबत. मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

**विषय क्रमांक ४-** वॉर्ड क्र. ३४ गव्हाणेवस्ती येथील कामांना मंजूरी देण्याबाबत. मा.सुरेखा गव्हाणे यांचे पत्र.

**विषय क्रमांक ५-** आरोग्य विभागाची शालेय इमारतीमधील खोली रिकामी करुन मिळणेबाबत. मा. Adv. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

अ) दिनांक ३/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा(कार्यक्रमपत्रिका ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- ४ विषय क्रमांक- १
दिनांक- १/७/२०१५
सूचक- मा. मंदाताई आल्हाट अनुमोदक- मा.सुरेखाताई गव्हाणे
संदर्भ- मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये गांव मौजे मोशी संदीप अनंता सस्ते (बो-हाडेवाडी) पुणे, गट नं.२७५ येथे अनंतनगर मोशी बो-हाडेवाडी असे रस्त्यास व कमान तयार करुन त्यास नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. (सदरील रस्त्याची जागा ही संदीप अनंता सस्ते यांच्या स्वमालकीची आहे.)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ५ विषय क्रमांक- २
दिनांक- १/७/२०१५
सूचक- मा. मंदाताई आल्हाट अनुमोदक- मा.सुरेखाताई गव्हाणे
संदर्भ- मा.मंदाताई आल्हाट यांचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन खालील विषयाला नाव देणेबाबत. १)खानदेशनगर मोशी या ठिकाणी स्वर्गीय प्रितम शरद बो-हाडे चौक हे नांव देण्याबाबत २) कै.सावळाराम बाबाजी सस्ते पाटील हे नांव पिंपरी चिंचवड महापालिकेचा दवाखाना आहे ती जागा त्या जागामालकाची आहे त्यामुळे त्यांचे नाव दयावे ३) बो-हाडेवाडी येथील जलकुंभ पाण्याची टाकीला दिवंगत नगरसेवक स्व.अंकुशराव बो-हाडे जलकुंभ हे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ६ विषय क्रमांक- ३

दिनांक- १/७/२०१५

सूचक- मा.अनुराधा गोफणे अनुमोदक- मा.आशाताई सुपे

संदर्भ- मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

प्रभाग क्र. ३३ मधील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. प्रभागामध्ये इतरत्र जागा उपलब्ध नसल्यामुळे सर्व्हे नं.२०० मधील आरक्षण क्र.४०७ खेळाचे मैदानमधील सुमारे १५ गुंठे जागा पाण्याच्या टाकीसाठी देण्यास मान्यता देण्याचा विषय प्रभाग समितीमध्ये मंजूर करणेत येऊन शहर सुधारणा समितीकडून मा महापालिका सभेपुढे मंजूरीसाठी शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरचा ठराव शहर सुधारणा समितीकडून मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ७ विषय क्रमांक- ४

दिनांक- १/७/२०१५

सूचक- मा.सुरेखाताई गव्हाणे अनुमोदक- मा.आशाताई सुपे

संदर्भ- मा. सुरेखाताई गव्हाणे यांचे पत्र.

वॉर्ड क्र.३४ गव्हाणेवस्ती येथे खालील कामांना मंजूरी देणे. १) रोहीदास खोंडे घरामागील ब्लॉक पाणी पाईप लाईन बदलामुळे काढले आहेत ते बसविणे.२) ज्ञानेश्वर फुगे घश्रज्ञप्फढील ब्लॉक काढले आहेत ते बसविणे ३) जे.पी.नगर येथील ब्लॉक बसविणे ४) मारुती गव्हाणे घराशेजारी बलॉक बसविणे ५) ज्ञानेश्वर गव्हाणे घरामागील भुमिगत ड्रेनेज लाईन मोठी टाकणे ६) श्री.पाटील यांच्या घरामागो जे.पी.नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे ७) खंडोबा माळ येथील गटर लाईन बंदीस्त करणे ८) गव्हाणे वस्ती येथे ब्लॉक बसविणे ९) भोपते वस्ती येथे संडास ब्लॉक दुरुस्त करणे१०) खंडोबा माळ येथे संडास ब्लॉक दुरुस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- ८ विषय क्रमांक- ५

दिनांक- १/७/२०१५

सूचक- मा. Adv. नितीन ज्ञानेश्वर लांडगे अनुमोदक- मा.

संदर्भ- मा. Adv. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

वरील विषयान्वये आपल्या येथील मनपा भोसरी इंग्रजी माध्यम शाळा सन २००३ साली स्थापन झाली आहे. सदर शाळेची पटसंख्या ७७६ आहे. सदर शाळा दोन मजल्यावर भरत असून (तळमजला व पहिला मजला) त्यातील तळमजल्याची एक खोली आरोग्य विभाग वापरत असून शाळेची गैरसोय होत आहे. दिनांक १८/६/२०१५ रोजी देखील पत्राद्वारे आपल्याला सदर शाळेच्या वर्ग खोली विषयी कळविले असून त्यावर आत्तापर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. तरी लवकरात लवकर ती खोली रिकामी करुन मिळावी. त्यामुळे शालेय कामकाजासाठी वर्ग खोल्या कमी पडत असून आरोग्य विभागाची वर्ग खोली रिकामी करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

दिनांक १/७/२०१५ चे मासिक सभेत कार्यक्रम पत्रिकेवर विषय नसल्याने मा.सदस्यांनी ऐनवेळच्या विषयावर चर्चा केली.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर)
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/२७०/२०१५
दिनांक- ०८ /७/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक१/७/२०१५ चे मासिक सभेत मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे चर्चा केली.**

-----

**मा.धनंजय आल्हाट** – कमान बांधता येत नाही. आपल्याला कमान बांधता येईल का? परंतू भोसरी येथे काही ठिकाणी कमान बांधलेल्या आहेत.

**मा.वाघमारे (उपअभियंता)** – भोसरी येथील कमान पुर्वी बांधलेल्या आहेत. त्या कमान आता बांधलेल्या नाहीत.

**मा.धनंजय आल्हाट** – भोसरी येथे आता सध्या कमानीचे बांधकाम चालू आहे.

**मा.वाघमारे (उपअभियंता)** – सन २०१४ पुर्वी बांधलेल्या त्या कमानी आहेत.

**मा.धनंजय आल्हाट** – आपण सभागृहाची फसवणूक करीत आहात. याबाबतचा आम्ही ठराव घेणार आहोत. आपण आम्हाला नियम दाखवा. एकाच्या वॉर्डमध्ये कमानीचे काम करीत आहात तर सर्वांच्या वॉर्डमध्ये झाले पाहिजे. सर्वांना समान न्याय दिला पाहिजे. आत सध्या तुम्ही भोसरीमध्ये कमानीचे काम करीत आहांत.

**मा.वाघमारे (उपअभियंता)** - वर्कऑर्डर दिलेली आहे त्यामुळे काम चालू आहे.

**मा.विनया तापकीर (सभापती)** - वर्कऑर्डर दिलेल्या आहेत तर वर्कऑर्डरची तारीख दया.

**मा.धनंजय आल्हाट** – कमानी बाबत जी.आर.ची कॉपी दया. भोसरीमध्ये होत आहे मग बाकी ठिकाणी का होत नाही. नाही तर मग कुठेच करु नका.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** - जी गोष्ट शहरी भागात होत आहे ती गोष्ट ग्रामीण भागात सुध्दा झाली पाहिजे. आम्हाला जी.आर.ची कॉपी दया व वर्कऑर्डरची तारीख दया.

**मा.धनंजय आल्हाट** – आम्ही कुठेही काम करु देणार नाही. आमचा विषय जोपर्यंत होत नाही. मोशी, च-होली, डुडूळगांव या ग्रामीण भागांना सुध्दा काम दिले पाहिजे.

**मा.सुरेखा गव्हाणे** – यापुर्वी इंजिनिअर होते त्यांनी माझे वॉर्डमधील काहीच काम केले नाही. आता त्यांचे जागेवर कोण आले आहेत ते आले का मिटींगला? गेल्या तीन महिन्यापासून मी फोन करीत आहे पण कधी एक सुध्दा फोन घेतला नाही.

**मा.वाघमारे (उप अभियंता)** – सध्या काळे साहेबांकडे कार्यकारी अभियंता यांचा चार्ज आहे.

**मा.सुरेखा गव्हाणे** - सध्या सर्व फसवणूक चाललेली आहे. आमचे वॉर्डमधील काम करायचे का नाही ते सांगा, नाही तर आम्ही आयुक्तांकडे पत्र देणार आहे. पांचाळ आले आहेत तर त्यांनी मिटींगला आले पाहिजे.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – संबधीत कर्मचारी यांनी मिटींगला आले पाहिजे. त्यांनी फोन घेतला पाहिजे.

**मा.वाघमारे (उपअभियंता)** – काळे साहेब मिटींगला गेले आहेत. मी काळे साहेबांना व पाटील साहेब यांना सांगतो.

**मा.धनंजय आल्हाट** – प्रभागामध्ये सर्व जागांना, रस्त्यांना नाव देण्याचा ठराव सन्मा. सदस्यांनी घेतला हा महत्वाचा विषय घेतला आहे. परंतू ब-याच वॉर्डमध्ये नावामुळे वाद

निर्माण होतात. स्वातंत्र्य सैनिक, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, खेळाडू यांची नांवे दिली तर लोकांना पसंत पडेल. लोकांची भूमिका पारदर्शक असते. ब-याच गोष्टी लोकांना पटत नसतात. लोकांना आवडणारे पाहिजे. आपण शक्यतो स्वातंत्र्य सैनिक, समाजसुधारक, शास्त्रज्ञ, खेळाडू, ऐतिहासीक नांवे दयावी जेणेकरुन त्या भागाचे सौंदर्य वाढेल. संत, महात्मा यांची नांवे दयावीत. सणांची नांवे दयावीत. सण ही आपली भारतीय संस्कृती आहे. लोक टिंगल करतात अशी नांव न देता संताची नांवे दयावीत. राजकारणात असल्यामुळे आपण ठराव मंजूर करतो. मी कोणाच्या ठरावाला विरोध करीत नाही. कुटूंबातील व्यक्तींची नांवे देऊन तुम्ही लोकांना खूष करायचे. लोकांना ते सर्व मान्य झाले पाहिजे. अट्टाहासापोटी आपण समाजामध्ये काय निर्माण करतो. असे वाटते की अशी नांवे देऊ नये असे मी सुचवितो.

जलपर्णी बाबतचे काम कोणाकडे आहे. वाघेरेकडे असेल तर त्याचे बील कुणी ठेवले. मागचे वेळेचे रेकॉर्ड काय आहे. मी तुम्हाला खूप पुर्वीची १९४७ ची गोष्ट विचारत नाही. त्यांनी पुर्ण १०० टक्केचे बील घेतले आहे. ते तुम्ही पाहून आम्हाला सांगा. आता सध्या त्यांनी फक्त १० टक्के काम केले आहे.

**मा.भोकरे (सहा.आरोग्याधिकारी)** – दत्तकृपा कृपा एजन्सी, थोरात हे काम पाहतात.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – पुढच्या वेळेस त्या ठेकेदाराला बोलावून घ्या. त्यांना दंड करा. दंडाचा प्रस्ताव ठेवा.

**मा.धनंजय आल्हाट** – पुढचे बील त्यांना देऊ नका.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – आढावा मिटींग घेतली होती. प्रत्येक वॉर्डातील इस्टिमेट चालु आहे.

**मा.वाघमारे (उपअभियंता)** प्रभागातील ६३ कामे झालेली आहेत. विशेष कामे आता इ इस्टिमेट मध्ये आहे. २१४ कामे आहेत. प्रभागाची आपापल्या वॉर्डची कामे वेगवेगळी आहेत. दिघी, चक्रपाणी वसाहत मधील कामे माझेकडे आहेत. काळे साहेब आता मिटींगला गेले आहेत. त्यांना प्रत्येक वॉर्डची माहिती आहे.

**मा.धनंजय आल्हाट** – पुर्ण प्रभागाला आपण किती लिटर पाणी देता.

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता)** आपण ६५ लाख लिटर पाणी देत असतो. पिण्याचे पाण्याची पाईप लाईनमधून भोसरीला ६५ टक्के पाणी येते.

**मा.धनंजय आल्हाट** – ग्रामीण भागात NOC कुठली देता.

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता)** – पाणीपुरवठा विभाग NOC देत नाही.

**मा.धनंजय आल्हाट** – अंडरटेकिंग हे कुठल्या नियमांच्या आधारे देता. त्याबाबतचे काही नियम आहेत का? आयुक्त साहेबांचे काही आदेश आहेत का?

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता)** – मागणीच्या आधारे आपण देत असतो.

**मा.धनंजय आल्हाट** – बिल्डरला तुम्ही अंडरटेकिंग देता आणि नंतर ते बिल्डर निघून जातात. नागरीकांना पुरेसा पाणीपुरवठा केला नाही तर नागरीकांचा मोर्चा नगरसेवकांच्या घरी येतो. तुम्हाला मोठे पाईप लाईन टाकण्यासाठी बजेट नाही. जिथे पाईप लाईन टाकलेली नाही तेथे NOC कुठली देता. फसवणूक करीत आहांत. पुन्हा एकदा सांगतो अशा NOC देऊ नका.

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता)** – अंडरटेकिंग बाबत ठराव करुन घेतला तर लोक फार चांगले होतील. कनेक्शनमध्ये वाढ होईल.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – जिथे अडचण आहे त्या ठिकाणी देऊ नका.

**मा.आशाताई सुपे** – आमचेकडे दिघी येथे पाण्याचा खूप प्रोब्लेम आहे. सगळीकडे बांधकाम चालू आहे. जोपर्यंत पाणी सुरळीत येत नाही. तोपर्यंत NOC देऊ नका. तसेच मोशी दिघी येथे कनेक्शन देऊ नका.

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता) –** आपण पहिल्यापासून कनेक्शन देत आहोत. ४६० एमएलडी पाणी आहे. किती तर वेळ चालते. ठराव केला तर बरे होईल. आम्ही ठेवतो तो ठराव.

**मा.धनंजय आल्हाट –** बिल्डरला कनेक्शन देऊ नका.

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता) –** अर्धा इंच कनेक्शन आपण देतच असतो.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – वडमुखवाडी समोरील पाईप लाईनचे काय झाले. पाणीपुरवठा विभागाकडून आदेश तरी दया. लवकरात लवकर चालू करुन दिले पाहिजे.

**मा.धनंजय आल्हाट –** सर्व प्रभागामध्ये सर्व्हीसरोड करुन घेणे.

**मा.काळे (उपअभियंता) –** नाशिकफाटा ते इंद्रायणी पर्यंत रोडचे काम चालू आहे.

**मा.धनंजय आल्हाट –** प्रत्येकाच्या वॉर्डमधील रस्ते झालेले पाहिजे.

**मा.धनंजय आल्हाट** – ऑफिस पर्यंत रस्ता करुन टाका. त्याकरीता काय अडचण आहे.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – प्रभागांना मिळून काही बजेट नाही का? अजून किती इस्टीमेंट झाले आहे त्याचे डिटेल्स दयावेत.

**मा.काळे (उपअभियंता) –** १६८ कामे आहेत. ६८ कामे ओपन आहेत. एकूण ६३ कामे प्रभागांची होती. ५,६ कामे राहीली आहेत. ६५ कामे आहेत. प्रभागांची आणि हेडऑफीसची अशी दोन्ही कामाची माहिती देणे. तीनवेळा मुदतवाढ दिली आहे.

**मा.सुरेखा गव्हाणे** – माझे वॉर्डमधील खूप कामे पडलेली आहेत. पाऊस आल्यावर लोकांच्या घरात पाणी शिरल्यावर काय करणार?

**मा.काळे (उपअभियंता) –** लवकरच कामे करण्यात येतील त्यामुळे आता पाणी साचणार नाही.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** – सध्या कोणाचे काम चालले आहे. सगळया वॉर्डची कामे झाली पाहिजे. आतापर्यंत का झालेली नाही.

**मा.अनुराधा गोफणे** – ड्रेनेजचा प्रोब्लेम वारंवार होत असतो. आम्ही सारखी ड्रेनेजचे काम करणा-या मुलांना तक्रारी देत असतो. २३,२४ तक्रारी असतील वेळोवेळी त्यांना दाखवतो. ती मुले चेंज करतात. छोटी गाडीतून घाण काढतात. पावसाळा सुरु झाल्यावर ड्रेनेजचा प्रोब्लेम जास्त होतो. तुम्ही ड्रेनेजचे काम करण्यासाठी मुले तरी वाढवा नाही तर काही तरी मार्ग काढा. लोकांच्या घरात घाण पाणी जाते. दोन मुले तरी वाढवा. मोठी गाडी आता तुम्ही देऊ शकत नाही?

**मा.मनोज सेठीया** - ड्रेनेजचे काम करणेत येईल.

**नगररचना विभाग** – १२ मीटरचा ताबा मिळाला आहे.

**मा.धनंजय आल्हाट –** १२ मीटरचा ताबा वखार मंडळ भोसरी कडे आहे.

**नगररचना विभाग** – बीआरटीएस ५ ते ८ टक्के काम आहे. पीडब्ल्युकडून संयुक्त मोजणी झालेली आहे. कलम ८ च्या नियमानुसार चालू आहे. भूसंपादन होते, पी.डब्ल्यूचा वाद होता तो आता मिटवला आहे. आता त्यांचेकडून आढावा घेतो.

**मा.धनंजय आल्हाट** – तुम्हाला त्यांनी पत्र दिलेले आहे. तुम्हाला त्यांनी स्टेटस दयावे.

**मा.Adv.नितीन लांडगे** – भोसरी गावांतील शाळेच्या वर्गाची आरोग्य विभागाकडील आदेशाने सगळी कामे झाली पाहिजे. भोसरीमध्ये नववी इंग्रजी माध्यमाला परवानगी मिळाली आहे. आजच उद्घघाटन झालेले आहे. आरोग्याचा आदेश होता तो काढणे. पर्यायी जागा तेथे

सुचविली आहे. तो वॉचमन तेथे राहात आहे. रोजंदारीवर जे लोक आहे ते गैरवापर करतात. आज साफसफाई चालू होती.

**मा.धनंजय आल्हाट –** आपल्या प्रभागातील स्पीड ब्रेकर हे कलर नाही. त्यामुळे अपघात झालेले आहेत. वाहतूक विभाग हे काम करीत होते. बीआरटी ला ते काम वर्ग केले आहे. त्यामुळै स्पीड ब्रेकरचे काम ते करीत आहेत. एका पावसात त्याची वाट लागली आहे. आता त्या कामाचे टेंडर काढले आहे का?

**मा.वाघमारे (उपअभियंता) -** बीआरटीकडेच त्या कामाची तरतूद आहे.

**मा.धनंजय आल्हाट-** कुणाकडे टेंडर आहे ते टेंडर काढून घ्या. पावसाचे अपघात होतात. त्यामुळे लवकरात लवकर पावसाळयाच्या आत पट्टी मारता येईल असे काम करा.

**मा.काळे (उपअभियंता) -** स्पीड ब्रेकरचे नवीन काम आपण करीत असतो.

**मा.धनंजय आल्हाट -** कामे करीत होता तर अर्धवट कामे करुन नका, कामे पुर्ण करा.

**मा.Adv.नितीन लांडगे –** १०० मीटरचे रस्त्यांना चार प्रकारचे स्पीड ब्रेकर असते. किती तरी काँक्रीट असते. स्पीड ब्रेकर बाबत शिस्तीत काही तरी केलेले असते का? माझी स्वताची मागणी आहे. त्याची माहिती सगळयांना दिली पाहिजे.

**मा.धनंजय आल्हाट –** त्या त्या विभागाची डिझाईन मागवून त्याआधारे टेंडर आता निघालेले आहे सगळे काढून घ्या नवीन आधुनिक पध्दतीने करा.

**मा.काळे (उपअभियंता)** - विशेष योजनेची प्रस्तावित काम आहेत. नियमसनुसार डिटेल कामे असावीत.

**मा.धनंजय आल्हाट –** माऊलींची पालखी येणार आहे. आरोग्य विभागाची काय तयारी आहे? जशी परिस्थिती असेल तेवढे पाणीपुरवठा वाढवा. मागणीप्रमाणे कामे पुर्ण करा.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** - मागचे वेळेला स्टेज तुटला होता. त्यामुळे स्टेज व्यवस्थित असला पाहिजे. सगळया प्रभागांच्या बातम्या पेपरला येत असतात. त्यामुळे सर्व काळजी घेतली पाहिजे. भाजीमंडई आत सरकवा.

**मा.मंदा आल्हाट –** पाण्याचे नियोजन व्यवस्थित करणे. देहू रस्त्याला पाणी वाढविले पाहिजे.

**मा.बरशेट्टी (कार्यकारी अभियंता) –** पाण्याचे नियोजन व्यवस्थित केले आहे. तसेच १२.३० ते ४.०० या वेळेस पाणीपुरवठा आहे. ६५ एमएलची मागणी आहे. मागणीप्रमाणे पाणी देणार आहे. तसेच आपलेकडे सोबत २ टँकर देतात.

**मा.धनंजय आल्हाट –** अनधिकृत बांधकाम सगळे किती आहे. १५ जून ते ३०जून २०१५ या कालावधीत मोहिम राबवली होती. काय कारवाई केली. अतिक्रमणचे लोक त्यांना दिले होते का नाही. त्याबाबतचे आदेश आहे त्याचा अवमान होत आहे. कमिटी नेमली होती. त्यांची किती वेळा मिटींग लावली. आढाचा का नाही घेतला.कि ती मिटींग घेतल्या आहेत. कमिटी स्थापन करुन किती दिवस झाले आहेत. नावापुरती त्यांनी केलेली आहे का? शासनाचे परिपत्रक आहे. अंमलबजावणी का करीत नाही? अनेक लोक आहेत त्या कमिटी मध्ये. त्यांची मिटींग घ्या.

**मा.श्रीनिवास दांगट (प्रशासन अधिकारी) –** या मोहिमेमध्ये आळंदीरोडला जे अतिक्रमण होते त्याचे काम करीत होतो. दिनांक १२ व १४ तारखेला मिटींग होती. सगळे नगरसेवक बजेटच्या मिटींगला होते. त्यामुळे परत एक मिटींग बोलवावी. मा.अध्यक्षांच्या परवानगीने मिटींग घेण्यात यावी.

**मा.मंदा आल्हाट** – मोशी येथील रस्त्यावरील खड्डयामुळे अपघात झाले आहेत. त्यामुळे ताबडतोब रस्त्याचे काम करावे.

**मा.पाटील (उपअभियंता)–** मोशी येथील रस्त्याचे काम करुन घेतो.

**मा.अनुराधा गोफणे –** विशेष योजनची जी कामे आहेत ती कोणत्या वॉर्डची आहेत?

**मा.काळे (उपअभियंता)–** क्र. ४०७ भाजीमंडईचे इस्टिमेट चालू आहे. दिघी येथे बहुउद्देशिय इमारतीचे आहे. क्र.१/१७५ सीमा भिंत, खेळाचे मैदान आहे. क्र.४१५ मध्ये मोठी कामे आहेत. त्याकरिता आर्किटेक्चर नेमलेले आहेत.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** - टेंडर पब्लीश कधी होईल?

**मा.काळे (उपअभियंता)–** इस्टीमेंट तयार करुन टेंडर पब्लीश करण्यासाठी एक महिना लागेल.६,७ आठवडयात मा.आयुक्त साहेबांकडे सहीसाठी ठेवतो.

**मा.धनंजय आल्हाट –** १५ तारखेपर्यंत मिटींग घेण्यात यावी. स्थापत्य विभागाचे इंजिनिअर यांचेशी तुम्ही बोलून घ्यावे.

**मा.श्रीनिवास दांगट (प्रशासन अधिकारी) –** इलेक्शनची विशेष मिटींग घ्यावी लागेल. त्याबाबतची प्रोसेस चालू होईल.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती) –** आढावा मिटींग ठेवतो ती घ्यावी लागेल.

**मा.आशाताई सुपे –** स्टाफ कमी आहे तो वाढविण्यात यावा.

**मा.विनयाताई तापकीर (सभापती)** - स्टाफ कमी असलेबाबतचे आपण वेळोवेळी पत्र सुध्दा दिलेले आहे. आढावा मिटींग येत्या १५ तारखेला घेऊ.

**मा.आशाताई सुपे –** बीव्हीजी च्या लोकांकडून औषध फवारणी बंद आहे. चालू वर्षाच्या शाळा आता सुरु होत आहेत. औषध फवारणी अजून केली नाही. फवारणीचे औषध बदलेले पाहि जे त्यामध्ये जास्त पॉवर नाही.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

---------